# महाराष्ट्रकवी.

## लहानांचें बंड !

## पुष्प–पराग.



लेखक व प्रकाशक—

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, बी. ए.,

कऱ्हाड.

# महाराष्ट्राच्या कवींचें कार्य

अध्यक्षीय भाषण.

पु. पां. गोखले.

(लोकमान्य प्रेस, कराड.)

शिक्षकाचा

# महाराष्ट्राच्या कवींचें कार्य

अभिप्राय

विवेकशक्तीच्या जोरावर विद्यार्थी आपले कर्तगारीचे नद वाहवूं लागले, त्या नदांच्या काठीं तळमळणाऱ्या जिवांची तहानभूक हरपूं लागली आणि अशा अखंड प्रवाहांचा रत्नकर आपल्या लाटा उचंबळवूं लागला म्हणजे तें दृश्य आत्मानंदानें भोगावें.

—पु. पां. गोखले.

अरेरे! मला पश्चात्ताप आज होत आहे. खरे दुःखाश्रु, अंतःकरणाचा खरा पीळ, चुकीची अस्सल खंती आज वाटती आहे मला. वेडी समजूत माझी– 'शिक्षकाची चाकरी सुखाची भाकरी.' अर्थ शास्त्रानें, पैपैशांच्या बाजारभावानें आतां या पंचवीशींत शिक्षकाच्या कपाळीं नाहीं सुखाची भाकरी! पण केल्या कर्तव्याच्या समाधानानें कपाळींची कोरडी भाकरी खातांना जी चव येते, तिचें सुख शिक्षकाजवळून कोण काढून घेणार? ब्रह्मदेव, जगाचा नियंता, जगाची संहारशक्ती कोणी कोणीसुद्धां राजहंसाची दूधगोडी हिरावून घेत नाहीं. शिक्षकाच्या धंद्यासंबंधीं माझी तश्शी भावना! छे, हो, शिक्षकाचा धंदा म्हणजे कामधेनु आहे कामधेनु. नव्हे, राजहंसात्मक कामधेनु आहे. दूध आणि पाणी भिन्न करावे, प्रत्येक गोष्टीतून पृथक्करणानें मनाला — शिक्षकाच्या नी विद्यार्थ्यांच्या– येईल तितके दूध पचनीं पाडावें. या मनमुराद दूध पिण्यानें धष्टपुष्ट झालेल्या विवेकशक्तीच्या जोरावर विद्यार्थी आपले कर्तबगारीचे नद वाहवूं लागले त्या नदांच्या कांठीं तळमळणाऱ्या जीवाची तहानभूक हरपूं लागली आणि अशा अखंड प्रवाहांचा रत्नाकर आपल्या लाटा उचंबळवूं लागला, म्हणजे हिमालयासारखे तें दृश्य आत्मानंदानें भोगावें! गुरूगिरींत, शिक्षकाच्या धंद्यात राष्ट्राच्याच काय, पण जगाच्याही उद्धाराचें सामर्थ्य आहे. पण आहे कां खरेंच? कां ती माझी केवळ कल्पनाच? होय, माझ्यापुरती तरी ती कल्पनाच! निदान या घटकेला तरी ती कल्पनाच ठरली! जन्माचा मी वेडेपणा केला असें मला वाटायला लागले.

कां बरें? काय झालें असें आज? दुसरें काय, आज येथें काव्य गायन झालें ना? तेंच. नसतो मी या काव्यगायनाला आलों–ऊं! हूं! मला जर या प्रसंगीं अध्यक्ष केलें नसते– मला हजर असणें जरूर होतें. तुम्ही हजारों तरुणांनीं काव्याचा रसस्वाद घ्यायचा, अन् मी काय पाप केलें! तुम्ही मला दरवाज्यांत धक्के मारले असतत कीं नाहीं, तरीसुद्धां मी हजर

राहिलों असतों. काव्यरसासाठीं सत्याग्रह करण्य इतका तरुण ताठरपणा या माझ्या उतार वयांतही आहे माझ्याजवळ ! पण – पण मला तुह्मीं अध्यक्षपदावर नसतें बसविलेंत ! हा माझा तोंड दाबून बुक्क्याचा मार झाला.

हा ! हां. कबूल, शंभर वेळां कबूल ! 'आतां गडि फू दादाशीं, तर मग गट्टी कोणाशी' ही किंवा कुंवरजींच्याकडे राजवाड्याच्या खिडकींतून पहात राहणाऱ्या राजकन्येची तिच्या दासीनें केलेली चेष्टा, तांब्याच्या कवितेंतून मीं ऐकली, तेव्हां मींही गुदगुल्या होऊन हंसलों दत्तांच्या 'शेजारील वेणुच्या बाहुल्याबरोबर' मींही बागडलों; त्यांच्या विश्वामित्राच्या कांठीं निसर्गरमणीयतेनें गंभीर झालों; दरिद्री आईच्या 'पाळण्यानें' विरघळलों. फुलामुलांच्या टिळकांची 'चिमणी' ऐकून द्रवलों अन् 'प्रियकर हिंदिस्तान' ह्मणतांच समरस झालों. विनायक करंदीकरांची ऐतिहासिक स्त्रीगीतें-विशेषतां शृंगार-वीर-करुणांचा सुखतर संगम असलेला तो रोमांचकारी 'जोहार' ऐकून मी वाहवलों. विनायक सावरकराच्या 'सागरास' देशभक्तीच्या लाटांनीं कल्लोळून सोडतांच माझ्या चित्तवृत्तीतही गुणविती खळबळ उडाली. अनंततनयांचा मोरोपंती थाट पाहून थक्क झालों. केशवसुतांची साधीभोळी पण नव्या दमाची, नव्या जमाची, हळव्या मनाची नी कळवळ्याची 'तुतारी' 'झपूर्झा' च्या गूढगुंजनांतून ऐकली. शब्दांच्या सजावटींतून मृदुल भावनांची किन्नरी सोडणारा 'परतीरीं कान्हा', मुग्ध शृंगाराचा 'घुंगुरवाळा' 'गलाबी कोड्यांतून' निराशप्रेमाचे सुस्कारे सोडतांना गडकऱ्यांच्या 'चिमुकल्या कविते'चा लाभ अपुरा पडला ह्मणून कोण नाहीं सुस्कारे सोडणार ? बालकवींचा 'अरुण' 'आनंदी आनंद' करायला लागल्याबरोबर 'बी' महाराजांची 'कमला' मन हरपून सोडते आणि वाटतें—काय वाटतें बरें ? शब्दांनीं सांगतां येतें तर फार बरें होतें. चितार्‍याच्या कुंचल्याला अन् कवींच्या शब्दाला जें दाखवितां येत नाहीं तेंच त्यांनीं काढलेल्या चित्रांतील अप्रतिम सौंदर्य असतें. आणि हें सौंदर्य चितार्‍याच्या आणि कवीच्या कलमबाजीवरून पाहणारानें अनुभवायचें असतें. 'अव्यक्त खुलें' करण्याची संवेदना ज्या हृदयाला साधली, त्या हृदयालाच रसिक हृदय ह्मणतात.

माझे हृदय रसिक आहे. असें तुह्मांला वाटले म्हणून तुह्मी मला अध्यक्ष केलेंत. तरीपण गायकांचे प्रास्ताविक भाषण भोंवलेंच मला! ह्मणालें ना ते कीं मला 'तांबे' आवडणार नाहींत कारण मला टेनिसन आवडत नाहीं ! अंतःकरणांतले विचार मोकळे मोकळे मांडण्याकरतां भाषेचा उपयोग होतो असें व्याकरणशास्त्र सांगते. पण मुत्सद्दि ह्मणतात कीं शद्बांच्या अवडंबरांतून मन बेमालूम लपवून ठेवणें हीच शब्दांची कला आहे. रसिक हृदयानें भाषेच्या कुशलतेची गंमत सांगतो हं! मुत्सद्दि जगाशीं बोलतांना कधींच 'नाहीं' ह्मणून ह्मणायचा नाहीं. रमणी आपल्य रंगलालाशीं बोलत चुकून 'होय' ह्मणायची नाहीं. मुत्सद्दि 'बरा' म्हणूं द्या, अन् त्याच्या मनाचा तो संपूर्ण नकार समजा. उलट रंमणीच्या 'बरं पाहूं' शब्दांतून बरोबर हो-

काराचा पडसाद तिच्या रंगलालाच्या अंतः-करणांत उठत असतो. मुत्सद्याच्या तोंडून होकार आला कीं त्याचा अर्थ ' कदाचित् ' असाच असतो, आणि तोच रमणीच्या संपूर्ण नकाराचा असतो. शब्दाच्या कसरतींतील हा लपडाव मोठा रमणीय आहे; नव्हे? असलाच लपंडाव मला करावयाचा असता. तर छान झाले असते. तारेवरचा नाच करून 'फड' न बिघडाविणाऱ्या धंदेवाईक अध्यक्षाला उलट तें शोभले असतें! पण मी पडलो शिक्षक-आणि शिक्षकाला आपला दिल खुला केल्या-शिवाय राहवत नाहीं.

माझ्या तरुण मित्रानो, मी जर रसिक, तर टेनिसन किंवा तांबे, वामन वा मोरोपंत, रामदास वा तुकाराम अगर वड्‌र्स्वर्थ मला आवडत नाहीं या म्हणण्यांत काय बरें अर्थ? कवि-तेचा कण कोठेही सांपडला तर रसिक हृदय तेथें घोटाळलेंच पाहिजे. भ्रमर जसा मध गोळा करतांना फुलाफुलांत भेद करीत नाहीं, तशी स्थिती रसिकांची असते. पण म्हणून तुलना करायचा प्रसंग आला, तर एकाचा कस दुसऱ्यापेक्षां जास्तकमी म्हणायला तो कां सोडील? तुलनेला घेतलेल्या कवींचा सोनेपणा कबूल करून कसांत कमीजास्तपणा खरोखर सांगताच येत नसला तर रसिक-पणातही सराफी करायला लागला म्हणायचा तो! सरस्वतीच्या साम्राज्यांत असल्या कस-चोरीच्या सराफीला जागाच नाहीं. मला पक्कें आठवतें कीं, आजचे गायक शेव-टच्या परीक्षेचा अभ्यास माझ्या हाताखालीं करीत असतांना मीं टेनिसन्—शेक्स्पीअर—वर्डस्वर्थ यांची प्रसंगोपात तुलना केली होती. कवि म्हणून—इतर कोणत्याही नात्यानें नव्हे हो,— राजकवि टेनिसन्‌पेक्षां शेक्स्पीअर आणि त्याच्यापेक्षांही निसर्गाशीं रममाण होणारा वर्डस्वर्थ मला अतिशय आवडतो. म्हणून याचा अर्थ असा कां तुम्ही करणार कीं स्कॉटलंडच्या डोंगरकपाऱ्या डोळ्यापुढें निजा-नंदानें उभ्या करणाऱ्या टेनिसनची मला कांहींच किंमत नाहीं. शब्दलालित्य आणि पंडितगिरी मोरोपंतांत शिगेला आली तर होनाजी बाळांत प्रेमरसाची गंगा वोरवेगानें दुथडी भरून राहिली आहे. समजा, मीं असें विधान केलें कीं, तुम्ही असें घेऊन चालणार काय कीं केकावलींतलि उचंबळणारा प्रेमरस अगर सीतागीतांतील शालीन स्त्रीहृदय मला नापसंत आहे. छे हो. असें कसें होईल? पण गायकांनीं तशी ताण घेतली खरी. शिक्ष-कानें विद्यार्थ्यांजवळ किती जपून बोलायला हवें, याचा मला खासा धडा मिळाला.

तो घऊन मराठी कवितेसंबंधी बोलायाचे तर कवितेची सुलभता महाराष्ट्रांत भरपूर आहे. एकोणिसाव्या शतकाच्या तिशी-पसतिशींत मराठी वांग्मयाच्या 'इंग्रजी' अव-अवताराला सुरवात झाली. ती वाग्गंगा आज हत्तीच्या पाण्याने फुगून चाललेली कोणाला नाहीं दिसत?

वाढत्या काळाचें एक एक वर्ष भूतकाळ म्हणायचा विचार करायला अवकाश—नव्या नव्या दिवसाचे भविष्यकिरण कल्पनेच्याही अरुणांतून पारदर्शक होण्याच्या बेतांत, नव्या नव्या वांग्मयशाखांचे तलावच्या तलाव मरा-ठीच्या नगरींत अभिनव उत्साहानें बांधलेले दिसतात पण त्यांतील शंभरीं पंचाण्णव तला-वांना खोलीच नाहीं अन् खोलींत पाणी नाहीं, असें दुर्दैव आहे.

**काव्य शब्दांत नसतें**
**काव्य शब्दरेखांच्या कोऱ्या-**
**करकरीत पोकळींत असते. म्हणून ललि-**
**तेला ललिता व ललिताला ललित म्हणून**
**पक्की समज घेण्याकरितां 'खाजगींत' जाऊन त्यांचे**
**वरवरचे सारे कपडे उतरले पाहिजेत आणि**
**सांगितले पाहिजे कीं, —**
**'ही कविता — हे गद्य'**

ज्ञानेश्वर—मुक्तेश्वर-तुकारामानंतर चारदोन अपवाद सोडले तर जगापुढें सर्वमान्य असं वांग्मय किती निर्माण झालें? निसर्गाचा महाराष्ट्रांत वैचित्र्यपूर्ण विस्तार असतांना आपुलकीची संवेदना देणारे वर्ड्स्वर्थ किती निपजले? याचें कारण काय बरें? मुख्य असें कीं, वांग्मयाची व्याख्याच आमच्या लेखकांच्या लेखणीच्या टोकावर मुरून उतरली नाहीं. वांग्मय ह्मणजे जीवनादर्श. ललित वांग्मय मानवी जीवनाला आईच्या हृदयासारखें वत्सल आणि प्रियेच्या अंतःकरणासारखे गुदगुल्या करणारें हवें. या ललित वांग्मयाच्या गद्य व पद्य अशा दोन शाखा. परमेश्वरी सृष्टींत संसाराचें ललित वांग्मय देखील रंगांगनानीं, विनत—वानितांनीं सजविलेलें आहे. जीवनाच्या जामदारखान्यांत जेवढें ह्मणून खरबरीत, खणखणीत, खळखळीत, टणक, दणगट, हादरे देणारें तें सारें गद्य. जेवढें म्हणून मऊ, लुसलुशीत, गुलजार, गुंगविणारें, तें सारें पद्य, ती कविता.

पण या दोघांनाही नाटकी संवयीं आहेत. रामायणांत असा प्रसंग आहे कीं, विलासभुवनांत एकदां श्रीराम गमतीनें सिता बनले आणि सीतामातोश्री श्रीराम बनून राहिल्या. वशिष्ठाच्या ध्यानाचा घोटाळा असा झाला कीं राम म्हणतांच सीता! बरोबर असलीच रामसुधा गद्यपद्यांच्या बाबतींत केव्हां केव्हां आढळून येते. देखावे दिशाभूल करतात. 'खडा मारायचा झाला तर!' म्हणून खिझविणारी दर्शनी रुक्मिणी बालगंधर्व असल्याचा प्रत्यय येतो! कविता म्हणून हाताळावी तों गद्य हाताशीं लागतें. बरें वसुंधरेच्या पातिव्रत्यावर पुरुषार्थ गाजविण्याचा हिय्या बाळगून चवताळलेली नागीण हातावर खेळविण्याची घमेंड मारणारा वृंदावन तपासावा तों 'अंबू' आढळांत येते अन् दोन पावलें मागें पडतात. गद्य म्हणून हाताळावें तों पद्य हृदयाशीं बिलगते.

म्हणून वृत्तछंदांच्या ठरावीक पदांनीं आपल्या अलंकारांसह आनंदीआनंद करून सोडणें, ही जुन्या आर्यस्त्रीप्रमाणें कवितेची साधारण रीत असते खरी, पण तिचा विहार स्वतंत्र असतो; आणि असें असूनही कित्येकवेळां ती युरोपियन योषिताप्रमाणें पुरुषवेषानें मिरवण्यास कमी करीत नाहीं ! जुन्या काळीं ह्मणजे पिढ्यापिढ्यांच्या परंपरेनें तोंडातोंडीं वांग्मय जीवंत ठेवण्याची अवश्यकता असलेल्या काळापासून, वांग्मयप्रसार ह्मणजे चुटकीचा खेळ करून सोडणाऱ्या छपाईची कला उफाड्यानें वावरूं लागेपर्यंत, जातिवंत गद्यसुद्धां अगदीं कवितेच्या पावलावर पाऊल टाकून जाण्याइतकी बाइलबुद्धि बाळगून होते. ' यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः' असा तो काळ होता. आतां "यत्र नरास्तु पूज्यंते रमन्ते तत्र वै स्त्रियः" असा काळ जगाच्या वांग्मयक्षेत्रांत आलेला दिसतो. आणि ह्मणून रसिकानें फार काळजीपूर्वक वाचले पाहिजे. एक घरगुती उदाहरण देतो हं ! चटकन् पटेल ते. व्याकरणशास्त्राचा दर्दी, शब्दज्ञानाचें भांडार, छंदालंकाराचा धनी आला तुमच्यापुढें आणि याचना करूं लागला कीं, "अहो ते पत्र मीं लिहितो जें तुह्मी गुलाबी पाकिटांतून, गुलाबी कार्डावर गुलाबी हृदयानें लिहिणार तें........" तुम्ही काय उत्तर द्याल ? तुह्मी ह्मणाल कीं "छे, छे!!नांव काढूं नका अगदीं! एकांतांत, कोपऱ्यांत बसून येतील तशा फरगट्यांनीं, चुकलेल्या शुद्धलेखनानें, गिचमडलेल्या अक्षरांतून आह्मी बोलूं. तुमचा लांडा कारभार येथें नको." आणि खरोखर सांगू ? या तुमच्या उत्तरांतच मूर्तीमंत काव्य आहे. त्या तुमच्या पत्रांतही अस्सल काव्य आहे. काव्य शब्दांत नसते. काव्य शब्दरेखांच्या कोऱ्याकरकरीत पोकळींत असते. ह्मणून ललितेला ललिता म्हणून व ललिताला ललित म्हणून पक्की समज घेण्यासाठीं ' खासगीत ' जाऊन त्यांचे वरवरचे सारे कपडे उतरले पाहिजेत आणि सांगितले पाहिजे कीं ' ही कविता — हें गद्य '

पण गद्य असो नाहींतर पद्य असो, कवि वसंत म्हणतात ' शद्ब बापुडे केवळ वारा । अर्थ वागतो मनांत सारा ।। नीट नेटका शद्बपसार अर्थाविण पंगू. ' आणि म्हणूनच जशी लेखन तशीच वाचन ही कला आहे. शद्बसृष्टीचा ईश्वर झाला तरी तो आपल्या हृदयाचा आविष्कार अस्सल बरहुकूम कधींच करूं शकत नाहीं. मेंदूच्या मदतीनें त्याचें हृदय ज्यावेळीं शब्दरूप घेऊं पाहतें, त्यावेळीं तें नक्कलचें नक्कल ठरतें. समर्थांतली समर्थ शब्दसृष्टीसुद्धां हृदयाविष्काराच्या कामगिरींत अशी लुलीपांगळी आहे. आपल्या हृदयांत मुरलेल्या, आचरणांत उतरलेल्या आणि जगाच्या कल्याणासाठींच सांगितलेल्या श्रीकृष्णाच्या, वा व्यासाच्या ह्मणा हवें तर, तत्त्वज्ञानानें शब्दशृंगार सुंदरांतला सुंदर चढविला खरा, पण त्याचें रहस्य आकलतांना इतकीं बुद्धिवादाची भाष्यें झालीं कीं चौकस वाचकाचीही दृष्टी फिरून जावी ! आणि याचें कारण काय ? तर कितीही केलें तरी ' शब्द बापुडे केवळ वारा ! ' मनांतला अर्थ समजावयला तद्रूपताच लागते. ही तद्रूपता फिरून शब्दांच्या किलकिल्या झुरोक्यांतूनच साधावयाची असते ! आणि म्हणूनच एका उदात्त अर्थी हा सारा चोरीचा मामला कलेचा

स्वरूपसाज पटकावून बसला आहे. हृदयाचा तंतून् — तंतू शब्दांच्या टणत्कारानें पिंजून पिंजून वाचकांच्या हातीं सादर करावा म्हणून धडपड चालली असतांना जेथें अशी अंधळ्या पांगळ्यासारखीं धडगत लागते, तेथें सुतावरून स्वर्गाला जाण्याची खूण देणारी शब्दसृष्टी किती गोंधळ उडवीत असेल, नाहीं ?

एवढ्यावरूनच, ध्वनिकाव्य लिहिण्याची अगर वाचण्याची कला येरागबाळांची नव्हे असें जें अधिकारी रसिक सांगतात तें पटेलच पटेल. कविनें ' सु ' ह्मणावें, आणि प्रसंगानु रोधानें रसिकांनें ' सुरा ' किंवा ' सुधा ' समजावें असा खाक्या चालतो तिथें. शब्द सोडलेला अगर अक्षरें गाळलेला धडा लावून वाचण्याची संवय ज्या रसिकांच्या अंगवळणीं पडलेली असते, त्यांलाच ध्वनिकाव्यें वाचतां येतात. त्याचप्रमाणें तावून, सुलाखून, घासून, पुसून, परजून, पाणी देऊन ठेवलेल्या रेखीव, कांतीव, कोरीव कुशलतेच्या शब्दांनीही आपल्या हृदयाचा आविष्कार करणें कविला अशक्य होतें, किंबहुना शब्दांच्या सजावटीनें शृंगारणें हें कमीपणाचें मानण्याइतकीं ज्या वेळीं कवीची भावनासृष्टी बेगुमान योग्यतेची असते, त्यावेळीं आणि बहुधा त्याचवेळीं पौर्णिमेच्या चंद्रावरील कलंकाप्रमाणें, भरघोस मोत्यांनीं भरलेल्या उभ्या शेतांतील दृष्टीच्या बाहुल्याप्रमाणें, सम्राज्ञीनें घातलेल्या काळ्या बिल्वराप्रमाणें, कविसम्राटानें घेतलेल्या रंगभूमीवरील विदूषकाच्या सोंगाप्रमाणें, कुबेरानें हौसेनें केलेल्या कुलालघटाप्रमाणें, उगीच कोठें शब्दाच लेणें जनरीतीसाठीं घेऊन आपलें नितांतरम्य दर्शन हृदयाची श्रीमंती देत असते; आणि तो शब्दच ध्वनिकाव्य—काव्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून वावरतो. तथापि अशी ओळख पटावयास नी टिकावयास एकांतात गांठ पडणेंच चांगल. हृदयें मिळायला, मनोमन कविची आणि रसिकांची साक्ष पटायला, एकान्त आणि एकांत हाच तेवढा उपाय आहे. तेथें बुद्धीला बुझावते, मेंदूमार्गें मनीं ठाण देतें तें सारें गद्य. हृदयाला हात घालते, भावनांला भुलवते ती सारी कविता. या हृदयोत्सवांत कानांनीं आपल्या संगीताची लांबी वाढवूं नये. कानाना खूष करतें तें संगीत असलें तरी काव्य असेलच असा नियम नाहीं. आजकालच्या काव्यगायनांतून कानांची जितकी करमणूक होते, त्याच्यामानानें हृदय कितीसें हेलावतें ? माझा मन्हाठाची बोल कौतुकें । अमृतातेंही पैजा जिंके ' असा आत्मविश्वास कविच्या अंतःकरणांत उदय पावल्याशिवाय, जातिवंत कविता हृदय ओथंबून कशी निघेल ? विषयाची तंद्री लागल्यामुळें हृदयाच्या हृदयांतील भावना पौर्णिमाअमावास्यांच्या समुद्रभरतीलाही मागें टाकण्याइतक्या उचंबळताहेत; त्यांच्या तुषारांचीं अक्षरें नादब्रह्माच्या आविष्कारासाठीं अर्थप्रचीतीनें धडपडताहेत; सुतराम् सहजता सांपडल्यामुळें रसिक हृदयांचा ठाव घेण्याइतकी शब्दसृष्टी सूचक झाली आहे; त्या शब्दसृष्टीचा शृंगार आपल्या रमणीय रुमझुमानें सरस्वतीच्या मंदिरांत तन्मयतेची मूकतान घेऊन भान म्हणून असेल तें हरपून टाकते आहे–हृदयंगम कवितेचा हा कर्तबगार थाट मराठीच्या मंडपांत मोहोरण्यासाठीं आजच्या ज्ञाताज्ञात आणि उद्यांच्या उदयोन्मुख कवित्ररांनो महा-

राष्ट्राच्या राकट पण प्रेमळ जीवनाचे, महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय परंपरेचे, महाविकासशाली वैभवाचे, आणि महाराष्ट्राच्या क्षितिजस्थ सौभाग्यलक्ष्मीचे बारीक निरीक्षण करा; त्या सर्वांशीं आपल्या हृदयाच्या प्रेमळ साजुक, नाजुक तारा छेडा, त्यामुळें उद्भवणाऱ्या तान् तनाना मधून किन्नरीच्या प्रसन्नतेची चैतन्यगंगा ओघवती करा; आणि त्या गंगेच्या समर्थ प्रवाहांत देवी भवानीचें पाणी चमकूं द्या; म्हणजे आजचा हा मेषपाल महाराष्ट्र स्वताचें सिंहपण जागवून आपलें पाणी जगाला दाखवील; जगाचें पाणी ओळखून राहील; आणि धन्यतेचें पाणी कृतज्ञ डोळ्यांतून निघेल. शब्दसृष्टीच्या ईश्वरांनो, अभिवादनपूर्वक तुम्हांस ही माझी विनंति आहे

———

# थोरांविरुद्ध लहानांचें बंड!

लेखक:— बाळ बाबू

( लोकमान्य प्रेस, कराड )

# थोरांविरुद्ध लहानांचें बंड!

लेखकः— बाळ बाबू

> ‘वडील माणसें म्हणून आपण कधींच होतां कामा नये.’

## मुलांचे हक
### (बाल–सभा)

श्री वेडेः— दादानो आणि भाऊनो, आज आपण आपोआप कां जमलो आहात, हे सांगण्याची गरज नाहीं. जाहीरात काढून सभा बोलाविली नसल्यानें उद्देशपत्रिका वाचून दाखवायची गरज नाहीं. उद्देश ते उद्देश. ते वाचायचे नसतात. ह्मणून सर्वांच्या मनांत जो एकच उद्देश आहे तो पार पाडण्यासाठीं या सभेचें अध्यक्षस्थान श्री. डोळे यांनीं स्वीकारावें अशी मी विनंति करतो.

श्री. वाकडेः— माझे मित्र—काय नांव हो तुमचे ?

श्री वेडेः— वेडे

श्री. वाकडेः— हो. माझे मित्र वेडे यांच्या सूचनेला मी टेकू देतो. आपणा सर्वांचा उद्देश पार पाडण्यासाठीं डोळ्यांची योजना फारच योग्य आहे. अध्यक्ष हा शब्द अधि + अक्ष असा झाला आहे. अधि = वर व अक्ष ह्मणजे डोळा. वर लागले आहेत डोळे ज्याचे तो अध्यक्ष होय. म्हणून डोळ्यानींच सभेचा पुढाकार घ्यावा अशी माझी पुष्टी आहे.

श्री. डोळेः— श्री. वेडे व वाकडे यांच्यामार्फत आज्ञा झाली म्हणून मी खुर्चीवर बसतो. पण हा सारा प्रकार पाहून थोर थोर माणसें वेडे-वाकडे-डोळे खरोखरच करतील. पण त्याला भिऊन उपयोग नाहीं. आपला हक्क आपल्याला बजावलाच पाहिजे. निषेधाच्या सभा करून आजपर्यंत थोरामोठ्यानीं आपली नरडीं व मनगटें फोडून घेतलीं आणि टेबलाच्या फळ्या नादुरुस्त केल्या. आपण तसें केलें नाहीं तर आपण जगाच्या मागें पडूं. तेव्हां आपण घाबरू नका. मी समतोल समारोप करीन. अध्यक्षाला गप्प बसण्याशिवाय उद्योग नसतो. तेव्हां मी वर डोळे करून बसेन. आणि पेंगतां पेंगतां एकदां इकडे व एकदां तिकडे कलेन. अशा तऱ्हेनें समतोल सांभाळून शेवटीं मी सगळ्यांच्यावर सम ह्मणजे सारखे आरोप करीन. तरी श्री० चिमखडे यांनीं सभेस सुरवात करावी.

चिमखडेः— सहृदुःखी बांधवहो, आपल्या पुढें मी असा ठराव मांडतो कीं—

‘आपल्या इच्छेनें जमलेली ही मुलां[ची] सभा आज शेंकडो वर्षे मुलांच्यावर मो[ठ्या] माणसांनीं केलेल्या अन्यायांचा तीव्र नि[षेध] करते आणि यापुढें असला जुलूम एक क्ष[ण]भरही होऊं नये म्हणून विनविते.’

या ठरावानें आह्मी जगाला जाहीर क[रतो] कीं हे आमचें बंड आहे. बंडाशिवाय [आ]मचा मेंदू थंडच राहत नाहीं. वडीलध[ारी] माणसांच्या जुलमाला जर खंडच नाही [तर] त्यांना हा दंड दिलाच पाहिजे. वडील मा-

यांच्या बोलण्यांत बोल नाहीं. चालण्यांत तोल नाहीं; ह्मणून कशाला कांहीं मोल न येतां सारेंच फोल होऊन राहिलें आहे. ‘खरें बोला, खरें बोला, खरें बोला.’ असा यांचा आमच्या मागे तगादा. पण शेजारची शिजी-बाई शेण मागायला आली, तर आई तें सरलें ह्मणून सांगतें. आणि ‘हें बघ, आई आहे कीं शेण’ असें आह्मी ह्मटलें तर डोळे वटारून आमचें मेण करून टाकते. ‘आतां इतक्यांत येतों’ म्हणून जे बाबा बाहेर जातात ते आम्ही घोरासुराचें आख्यान लावल्यावर केव्हां येतात त्यांचे तेच जाणे !

मुलांनीं शरीर कमवावे असें सांगतात. ‘या जगांत दोन टोले द्यावे अन् दोन टोले घ्यावे लागतात’ असा वडील माणसें उपदेश करतात. आम्ही असा कांहीं उद्योग केला, तर त्याचे कौतुक तर यांना नाहींच; पण हातांत काठी घेऊन आमच्या अंगावर वस्कन यायची यांची तयारी ! शरीर कमवावे म्हणून आम्ही हुदड्या घालू लागलो, जिन्याच्या पायऱ्यावरून धाडधाडधाड धांवपळ करूं लागलों किंवा बागेच्या कठड्यावरून उड्या घेऊं लागलों, तर यांची दुपारची वामकुक्षी बिघडेल म्हणून आमच्यावर वडील माणसें कातावतात. हा काय न्याय आहे ? या जगांत एक क्षणही मनुष्यानें उद्योगाशिवाय राहूं नये म्हणून सांगणारे हे महात्मे कुंभकर्णावर भर दिवसा ताण करतात.

काऊचिऊच्या गोष्टी सांगून चिमणीसारखे स्वतंत्र, आपले चारापाणी आपण वेचावयाला कां आम्ही गेलों रे गेलों, कीं आम्हाला वडील माणसांनीं एकाचे दोन केलेंच; आणि खाऊचा डबा देव्हाऱ्यांतल्या देवासारखा सोवळा झालाच ! आणखी किती म्हणून सांगावें ? म्हणून मित्रहो, आपला फारसा वेळ न घेतां, इतकेंच सांगतो कीं ‘सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील त्याचे’ हें रामदासाचें वचन लक्षांत ठेवून माझा ठराव आपण पसंत करावा.

श्री. बिचवे: -माझे नांव बिचवे. पोरे बिचवी निघावीत असे वडील माणसे सांगतात. पण माझा अनुभव उलटा आहे. आम्ही पोरे आपली नांवें सार्थ करूं लागलों, तर वडील माणसांना खपत नाहीं. मग ते आह्मांला नांवें ठेवतात तरी कशासाठीं ? त्यांचा भीम त्यांना सुदाम्या असला तरी चालतो. कृष्णाला गोरस न पचतां कृष्णानें घोटभर चहा घेऊन स्वस्थ रहावें अशी त्यांची अपेक्षा असते. रामांत मुळी राम नसला तरी वडील माणसांना खपतो. वडील माणसांना आपल्या मुलांचे कौतुक नसते; तर ती जातीवर जाऊन खोटेपणानें आपल्याच बरोबरीच्याचें कौतुक करतात. आम्ही मुलें मनमोकळें गातों, तर तें वडील-माणसांना खपत नाहीं; पण वेडीवाकडी तोंडे करून आणि पिशाच्चासारखे हावभाव करून पेटीतबल्यांच्या सहाय्यानें ओरडणारांना वडील माणसें पैसे दे–देऊन ऐकत बसतात. मांजरांची आणि कुत्र्यांची पिलें खाकेंत धरून आम्ही हिंडू लागलों, तर वडील माणसांचें डोळे हिरवेपिवळे होतात. पण खाकेला सिंह मारलेल्या भरताचे चित्र पाहून वडील माणसें वाखाणणी करतात. इतकें कशाला, तसलेंच प्रकार पाहायला रात्रीचा दिवस करून आणि पैसे खर्चून वडील माणसें सर्कसला जातात.

पैसे जाऊन पाहिलेल्या माकडचेष्टा वडील-माणसांना बऱ्या वाटतात. पण, माकडाच्या बरोबरीनें उड्या मारून आपल्याच पोटच्या गोळ्यांनीं झाडावर चढून चिंचा-पेरू खाल्लें वडीलमाणसांनां बघवत नाहीं. असा जिथें तिथें कृत्रिमपणा या वडीलमाणसांनीं फैलावून दिला आहे तो देवाला आणि आपणां मुलांच्या निष्पाप अंतःकरणाला कधीं खपणें शक्य नाहीं. ह्मणून मी रा. चिमखडे यांच्या ठरावाला पाठिंबा देतो.

श्री. वाकडेः— माझा मुद्दा माझ्या नांवा-प्रमाणेंच करडा आहे. आम्हीं मुलें दुखणी-बाणीं काढण्यांत कमालीची सहनशील असतो. आम्ही चिंचा, कैऱ्या धोंड्यांनीं पाडून खातो, तर झालेला विकारही तितक्याच धीरानें काढूं शकतो. वीराच्या जखमा वीरच सोसूं जाणे ! 'शूर मर्दाचा पवाडा शूर मर्दानं गावा !' पण आमच्या पहिल्या पराक्रमाची आणि नंतरच्या सहनशक्तीची कांहींतरी ह्या वडील माणसें राखतात कां ? चापून आह्माला ते कडूकडू औषधें देतात ! आणि वर मिजास अशी कीं आमच्यावरील प्रेमामुळेंच ते ह्मणे हे कटु कर्तव्य करतात. वारे कटु कर्तव्य ! उसाचा रस आपण प्यायचा आणि एरंडीचे पान आमच्या माथ्यावर !

श्री. डोळेः— सदर ठरावाला कोणाचा विरोध आहे काय ?

श्री. गंधेः —आहे कोण येथें वडील माणूस?

श्री. बोलेः— मी मूळ ठरावाला उचलून धरण्याकरतां धांवत आलों आहे. वडील माणसें स्वतां जें विघातक काम करतात त्याला सायन्स-शास्त्र असें नांव देतात. पण मुलांनीं तसेंच कांहीं केलें तर त्याला उपद्व्याप ह्मण-ण्यांत येतें ! चाकूने बेडकी मात्रशीला फाड-ण्यांत, तिचा खून करण्यांत वडील माणसांना कांहीं वाटत नाहीं. आणि मुलांनीं एकाद्या पेपरवेटमध्यें फुलाच्या पाकळ्या कुटून शिरल्या अगर आरशाच्या बिलोरींत उन्हांत धरल्या-बरोबर निरनिराळे रंग कुठून शिरतात हे पाहण्याकरतां त्या आरशाचे दोन भाग केले की तितक्याच आह्मा वडील माणसांच्या कपा-ळाला पडतात. हा अन्याय दूर झालाच पाहिजे.

श्री. डोळेः— मित्रहो, झाले एवढे खल-बत पुष्कळ झालें. फार वेळ आपण हा खल खलूं तर 'बोलाचीच कढी बोलाचाच भात । जेवूनियां तृप्त कोण झाला,' अशी आपली स्थिति होईल ! तेव्हां हा निषेधाचा ठराव जसा आपण केला तशीच दुसरी कृतीही केली पाहिजे. आपण मुलें वडीलमाणसें ह्मणून कधींही होता कामा नये. 'रम्य तें बालपण देइ देवा फिरूनि' असें रडगाणें आजचीं वडीलमाणसें सारखे गात असतात. तेव्हां तसा रडका प्रसंग जर आपणांवर येऊं नयेसें वाटत असेल, तर वडीलमाणसें ह्मणून आपण कधींही होता कामा नये. एवढी खबरदारी जर आपण घेतली तर या पिढींत नाही तरी पुढच्या पिढींत तरी आपणा मुलांवर मुलींच जुलूम होणार नाहीं.

श्री. गडबडेः—आतां एकच गोड काम ! दोन मिनिटें ह्मणून दोन तास घेत नाहीं. आजची सभा ह्मणजे नुसता भास आहे. असें वडीलमाणसें ह्मणतील. पण त्यांच्या सभा तरी काय असतात ? वडीलांच्या हातांत सत्ता आहे तेव्हां ते आमचा ठराव गुंडाळून ठेवतील. पण आपल्या अध्यक्षांनीं जो उप-देश केला तो ते कसे गुंडाळणार ? ह्मणून माझ्यासुद्धां सर्वांचे आभार मानून मीही सभेचे काम गुंडाळतो.

# पुष्पपरागांचा गौरव.

पु. पां गोखले.
कऱ्हाड.

लोकमान्य छापखाना कऱ्हाड.)

क्रीडानैपुण्यावरील अभिनव लघुकथा.

# पुष्पपरागांचा गौरव.

## ' वाटर्लूची लढाई मी क्रिकेटच्या पटांगणावर जिंकली ! '

डॉ. आनंदीबाई जोशी स्वप्नांत उदाहरणें सोडवीत. सांगोवांगीच्या या चमत्कारापेक्षां येथील लक्ष्मीविद्यालयांत देखतांदेखत एक चमत्कार प्रत्यक्ष दाखवण्यांत आला. कुमारी नेत्रांजनादेवी पदर खोवून आणि कास घालून उभ्या होत्या. भगवती भवानीच्या रुबाबांत त्यांची आंगठेवण होती डोक्यावर दोन लिंबें पेललीं होतीं. त्यावर एक एक पाऊल ठेवून बाल बाळिभद्र मुरलीधराच्या टेसांत रंगून गेला होता. त्यांच्यापासून पसतीस फुटावर एक तोल उभारला होता त्याचे रिकामें पारडें नेत्रांजनादेवींच्या अमोरासमोर होतें. त्या पारड्यांत, शिकारी साजांत नटलेला कुमार पुष्पपराग उभा होता. त्याच्या हातीं घोड्याला बोट घातलेली 'गोळीघाली' सरसावलेली होती. पुष्पपरागाची नजर भूमातेकडे खिळली होती. त्या नजरेचे किरण जमिनीवरील आरशाशीं खिळले होते. हा आरसा जमिनीशी किंचित् तिरकस असा सुमारें सत्तर अंशांचा कोन करून राखला होता या आरशांत नेत्रांजनादेवींचें मस्तक, त्याच्यावरील लिंबें व लिंबावरील बाळिभद्राची चिमणी पावलें रेखीव प्रतिबिंबली होतीं. आरसा व नेत्रांजनादेवी यांच्या मधोमध गरगर फिरणारा कागदीं मासा लोंबकळता राखला होता. आरशांत पाहून या लोंबत्या माशाचा डोळा फोडून एका बारांत नेत्रांजनादेवींच्या मस्तकांवरील लिंब पुष्पपरागांनीं उडविलें. उडवलीं बरीक, कीं जिकडे तिकडे जयजयकाराच्या एकच आरोळ्या उठल्या, आनंदाच्या टाळ्यांचा कडकडाट झाला, पुष्पपरागांच्य डोक्यावर विद्यार्थी–विद्यार्थीनींनी अक्षरशः फुलें उधळलीं !

वरील वर्णन अतिशयोक्तीचें नाहीं. वर्तमानपत्र वाचावयाचें तें कमर कापून वाचावें, असा शास्त्रार्थ आहे. पण वरील वर्णनास तो न्याय लागूं करूं नये, अशी ' उदय सिंहाच्या' वाचकांस सविनय विनंति आहे. कारण लक्ष्मीविद्यालयांत कालच्या रंगपंचमीला जो खेळखुशालीचा समारंभ साजरा करण्यांत आला, त्यांतील अद्भुतरम्य कळस म्हणजे वरील नेत्रांजनादेवी व पुष्पपराग यांची कौतुकक्रीडा होय. प्रस्तुत वार्ताहराला, गेल्या आठवडाभर रोजचें क्रीडोत्सव वर्णन करतांना सहज कर्म वाटे; पण रंगपंचमीचा रंग जशाचा तसा उठविण्यास त्याचे शब्द ' केवळ वारा ' ठरत आहेत, असें त्याचें मन त्याला ग्वाही देत

# शक्तीचे अद्भूत प्रयोग.

श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत करांगुलीवर धारण करणें; मारुतीनें द्रोणागिरी पर्वत वाहून आणणें; राममूर्तीनें धावती मोटार टकरीनें थांबविणें; अगर त्यांनीं उभ्या पहारेचे कडे करून गळ्यांत अडकविणें; सँडोनें सिंहाबरोबर कुस्ती मारणें; छत्रपती संभाजीनीं अगर शाहुनीं रानची राणी फाडणें; प्रो. सँडोनें शिकागोस लोखंडी पूल हातावर पेलणें; द्रोणाचार्यानें कौरव पांडवांची विटी एका बाणांत वर काढणें; अथवा प्रो. सरतानसिंहानें बंदुकीच्या गोळीनें विहिरीतील लिंबू वर काढणें तसेंच सीताबाईचे इंद्रधनुष्याशीं घोडा घोडा खेळणें; सुभद्रेला रणांगणी सारथ्य करतां येणें हें सर्व शक्तिचें अद्भूत प्रयोग—क्रिडायोग अभ्यासानेंच साध्य झाले आहेत. कारण "असाध्य ते साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका म्हणें ॥" हा अभ्यास मात्र ध्रुव प्रल्हादाच्या भक्तिभावाचा हवा.

आहे. तेव्हां, मुमताजबेगमबद्दलच्या प्रेमाचें स्मारक म्हणून शहाजनानें उभारलेला ताजमहाल कलासौंदर्याच्या दृष्टीनें अप्रतिम असला, तरी त्यांत प्रेमसौरभ नाहीं, हें लक्षांत वागवून, पहिल्या परिच्छेदांतील तोटके शब्द व खेळखुशालीची रंगपंचमी, यांची सांगड घालावी ह्मणजे झालें.

पुष्प परागांच्या वर वर्णन केलेल्या कौशल्य-प्रदर्शनानंतर, त्यांचा सार्वजनिक रीत्या त्याचवेळीं गौरव करण्यांत आला. लक्ष्मीविद्यालयांत झालेल्या एकंदर प्रांतीय खेळखुशालीचा समारोपसमारंभ नव्या वर्षाच्या पहिल्या मुहूर्तानें होणार आहे. पण शब्दवेध करणाऱ्या पौराणिक दशरथाची किंवा ऐतिहासिक पृथ्वीराजाची आठवण करून देणारे आणि मत्स्यभेद करणाऱ्या अर्जुनाचें नवयुगीन प्रतीक झालेले कुमार पुष्पपराग हे येत्या एकादशीस पश्चिम गोलार्धांत संचारार्थ जात असल्याकारणानें, त्यांच्यापुरता गौरव समारंभ कालच साजरा करण्यांत आला. वैमानिक सम्राट म्हणून जगभर कीर्ति झालेले महाराष्ट्राचे कुशल कारागीर अरविंद आगाशे हेहि या समारंभाच्या प्रमुख पाहुण्यांत हजर होते. तेच पुष्पपरागांना आपल्या 'गौरीशंकर' विमानांतून पश्चिम गोलार्धावर नेणार आहेत. 'मागसलेला-मागसलेला' म्हणून दोनशें वर्षें हिणवलेला हिंदुस्थान अजूनही रत्नप्रसवक्षम आहे हें आधिभौतिक सुधारणेनें धुंद झालेल्या पश्चिमेच्या डोळ्यांत भरवावें आणि मेंदूवर ठिचून ठसवावे, हा पुष्पपरागांच्या व अरविं-

दाचा उद्देश आहे. गौरव समारंभाच्या प्रारंभीच समारंभाच्या सभास्वामिनी आणि आरोग्य खात्याच्या अध्यावेक्षिक देवीनिश्चलचंद्रिका यांनीं आरंभीच एका गोष्टीचा उल्लेख करून आपल्या डाव्या हातास जवळ बसलेल्या पुष्पपरागांच्या गळ्यांत रंगीबेरंगी गुलाबांचा हार घातला व एक लक्ष 'वाघाचे डोळे' भरलेली सुवर्णमांदुसा अर्पण केली. अत्तर नव्हे तर अत्तराचा वास म्हणून केलेल्या या आहेराचा स्वीकार करण्यासाठीं पुष्पराग उभे राहिले त्यावेळीं त्यांच्याकडे त्या आवारांत जमलेल्या लक्षावधि लोकांचे डोळे लागले होते. बिजलीबत्तीच्या किरणांचे झोत पुष्पपरागांच्या तोंडावर सौम्यपणें विलसत होते. वाफेशिवाय वा कोळश्याशिवाय तारवे नुसत्या संग्रहित वायुच्या दृढाकिरणानें जशी चालवावीत तसेंच खेळखुशालींचे सगळेच कार्यक्रम जणुं परमेश्वरच्या हातानें चालले होते. त्यांत पुष्पपरागांच्या गौरवाचा योग तर ज्याच्यात्याच्या जिव्हाळ्याचा. तेव्हां, पाणी वा कोळसा या अन्य तऱ्हेनें मानवी जीवनाला अवश्यक असणाऱ्या वस्तूंना हातही न लावतां यावज्जगत् असलेल्या वायुच्या संघर्षणदृढीकरणानेंच विजेचा अखंड प्रवाहकोश निर्माण केल्यासारखा हर्नॅफ हॅनिफचा आनंद प्रत्येक चेहऱ्यावर झळकत असला तर नवल नाहीं.

क्षितिजाच्या कडेशीं किंचित् धूसर असा मेघ पिंजून पडलेला असावा; उगवत्या सूर्याच्या उफाळत्या किरणांनीं आपल्या रौप्य सुवर्ण-धारांनीं त्या पिंजलेल्या मेघांची किनार व अंगविरलें मखमलावी; निरभ्र आकाशींची नीलिमा किंचित् गुलाबी हास्य मिरवीत असावे; मधून मधून सुवर्ण तांबूस ढगांचे खवले खवले आपल्या अंगच्या झालरी करून रंगावे— वाचकहो, अशावेळीं जी मनोमंगल शोभा येईल, ती शोभी पुष्पपरागांच्या गौरवप्रसंगीं लक्ष्मीविद्यालयाच्या क्रीडाभवनास आली होती. सत्कारपीठावर गुलाबी पातळें पेहेरलेल्या व पारवीं पोलकीं लेलेल्या पुष्पपरागांच्या शालामैत्रिणी ज्यावेळीं त्यांच्या स्तुतीपर पद्य गाऊं लागल्या त्यावेळीं पौर्णिमेच्या रात्रीं नक्षत्रें चमकल्याचा शारदीय आनंद ज्याचें त्याचें मन उपभोगीत होतें.

पुष्पपरागांनीं आहेराचा स्वीकार केला, तो रोमांच उभे राहिलेल्या अंगविक्षेपानें व भरलेल्या नेत्रांनीं विनयशील वन्दन करून केला. ते शब्दही बोलले नाहींत. पण "खंडीभर बोलून उंडामर छाप पाडता येत नाहीं; तर मुकेपणाचें ह्मणणें हृदयाला हात घालतें" या वचनाची सार्थकता, पुष्पपरागांनीं केलेल्या वंदनाच्यावेळीं कोणास म्हणून पटावयाची राहिली नाहीं. आपलें आशिर्वादात्मक भाषण करतांना निश्चलचंद्रिका देवींनीं अर्थातच तसेच उद्गार काढले व त्या पुढें ह्मणाल्या:—

'ग्रीक लोकांमध्यें प्राचीनकाळीं आलिम्फीक गेम्स होत किंवा साऱ्या जगाचे आजकाल बेल्जम-स्वित्सर्लंडमध्यें होत असतात त्यांची बरोबरी महाराष्ट्राचा हा छोटा समारंभ खात्रीनें करील. तथापि आपण ही प्रथा कोणाकडून उसनी घेतली नाहीं. द्रोणाचार्यांच्या वेळचें क्रीडारंग सोडून दिले तरी छत्रपति शिवाजी महाराजांचे वेळींही वरचेवर असे खेळखुशालीचे प्रसंग किल्याकिल्यावर होत असत व निष्णातांचा योग्यतेनुसार गौर-

होई इतकेंच काय, पण अशा राष्ट्रीय उत्सवांतून अहमहिमेकेनें जो मान मिळवून येईल, त्याच्याकडे उद्याच्या राष्ट्रीय अभ्युदयासाठीं ह्मातान्यांनीं पहावें, बरोबरीच्या तरुणतरुणींनीं आपला ललाम म्हणून आदर बाळगावा, बालगोपालांनीं व गुणासगुणांनीं आपल्यापरी सवाई होण्याची महत्वाकांक्षा बाळगावी; असा प्रघात होता. जिवंत समाजाचें हें जातिवंत लक्षणच होय. 'वाटर्लूची लढाई मी क्रिकेटच्या पटांगणांवर जिंकली.' हे इंग्रज सेनानायकाचे शब्द वरील दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचे आहेत. 'योगः कर्मसु कौशलम्' असे भगवंताचें वचन आहे. तेव्हां हा क्रीडायोग उद्यापरवाचे राष्ट्रीय स्तंभ जितका साधतील तितका हवा आहे. दुर्योधनाची किंवा समर्थांची जलस्तंभनविद्या, गोवर्धन पर्वत करांगुलीवर धारण करणें, एका हातावर सर्व द्रोणागिरी मारुतीनें वाहून आणणें, या अतिशयोक्त असल्यातरी सार सर्वस्वाच्या दृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारख्या पौराणिक शक्तिधारणा; राममूर्तींची 'धावती मोटार टकरीनें थांबविण्याची विद्या' अगर उभ्या पाहेरचें कडें करून गळ्यांत अडकविण्याची बाबाजी सोनाराची ताकद; सिंहाबरोबर सँडोनी मारलेली कुस्ती अगर छत्रपती संभाजीनीं वा कोल्हापूरकर शाहूनीं फाडलेली 'अंगावर चालून आलेली जंगलची राणी' शिकागोस प्रो० सँडोनी हातावर पेललेला लोखंडी पूल, द्रोणाचार्यांनीं कौरवपांडवाची विटी एका बाणानिशीं विहीरींतून वर काढली ती किंवा प्रो. सरतानसिंहानीं बंदुकीच्या गोळीनें विहिरींतील लिंबू वर काढलें तें;— हीं काय आणखी दुसरीं काय क्रीडायोगाचीं सुंदर उदाहरणें आतां बालबालिभद्रासारख्या चिमुरड्यांना देखील पाठ येतात. तेव्हां सीतामाई शिवधनुष्याचा घोडा घोडा खेळत होत्या, सुभद्रेला रणांगणीं सारथ्य करतां येत होते, अगर अलिकडच्या इतिहासप्रसिद्ध तांब्यांच्या मनुला शत्रुला 'हरणास गुरु करावयास लावण्याची' रणनीति अवगत होती, वगैरे वगैरे गोष्टी नेत्रांजना देवीसारख्या तरुणींना मी आठवून द्यायला पाहिजेत असे नाहीं. तथापि असले क्रीडायोग साधावयास अभ्यास सराव कमालीचा पाहिजे. 'असाध्य तें साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका ह्मणे.' हा अभ्यास देखील ध्रुवप्रल्हादांच्या भक्तिभावाचा हवा. "छत्रपतीसाठीं शिरावाचून धड लढविणाऱ्या मुरारबाजीची, पावनखिंडीला थर्मापायलीचें स्वरूप आणणाऱ्या बाजीप्रभूची वा धन्यासाठीं देहावर गुळणी करणाऱ्या चाफाजी टिळेकरांची भक्ति हवी. पतीला वाघानें खाल्ल्याची बातमी आल्याबरोबर जयदेवकवींच्या पत्नीचे प्राण आपोआप निघून गेले, इतकी चित्ताची एकरूपता झाली पाहिजे तरच नामदेवांनें साधलें, तशा पाषाणाच्या मूर्ती दूध प्यावयास लागतील. मग काळाला पुरून उरण्यासारखें तत्त्वज्ञान सांगणारा श्रीकृष्ण घोडे खाजवावयास लागेल, हें काय निराळें सांगावयास पाहिजे? कर्माला धर्म करायचा ह्मणजे हेंच अशी माझी तरी समजूत आहे. 'कोणतीही गोष्ट होईल कां? असा प्रश्न बावळट करतात. 'व्हावी' अशी इच्छा दुबळे प्रदर्शित करतात. 'व्हायलाच पाहिजे' असा आत्मविश्वास धीरवन्त दाखवतात तर 'ही पहा, झालीच ह्मणून

समजा ' असें सक्रीय आश्वासन तर्डफेच्या कुशलाकडून मिळतें. कुमार पुष्पपराग आत्म-विश्वासाच्या पायरीवरून कुशलाच्या पायरीवर नुकतेंच यशस्वी रीतीनें पाऊल टाकीत आहेत तें त्यांचें पाऊल ठाम पडो, आणि ब्राह्मणाचे पाऊल विष्णूनीं भूषण म्हणून मिरवलें, तसेंच पुष्पपरागांचें पाऊलही जनताजनार्दन हृदयाशी निरंतर बाळगो, असा ' केवळ वयाचा अधि-कार म्हणूनच ' पुष्पपराग यांना आशीर्वाद देऊन व हे वत्सलतेचे दोन शब्द बोलण्याची संधी दिल्याबद्दल उत्सवचालकांचे आणि ते गोड करून घेतल्याबद्दल येथील आबालवृद्धांचे नमस्कारपूर्वक आभार मानून मी आपली रजा घेते. "

निश्चल चंद्रिकादेवींच्या या उत्थापन भाषणा नंतर "वंदेमातरम्" होऊन समा-रंभ संपला. समारंभ संपला, पण पुष्पपरागांच्य भोंवतालचा गुणग्राहक घोळका मुळींच ओस रण्याचें चिन्ह दिसेना. पेशव्यांच्या दरबार नृत्यगानांत तरबेज असलेली ' वेंकटरमणा तेवढ्या दोनच कलांत हात धरून देत नव्हती तरी तिची जो तो चहा करीत असे. मग उदा मनोवृत्तीचा, उमद्या मनगटाचा, सूक्ष्मग्राह मेंदूचा आणि रसाळ वाणीचा पुष्पपराग आप ल्याशीं एकादा शब्द तरी बोलावा असें कोणा वाटणार नाहीं ? कालच्या गर्दीमुळें ज्यां तो योग आला नाहीं, त्यांच्यासाठीं पुष्पपर गांची मुलाखत ' उदयासिंह ' उद्यां देईल.

आमचीं

# लोकप्रिय पुस्तकें.

| | किंमत |
|---|---|
| अभ्युदयाचीं नवरत्नें | ०—१-६ |
| शारदासदन | ०—८-० |
| विवेकविहार | ०—८-० |
| ज्ञानकिरण | ०—८-० |
| रुक्मिणीस्वयंवर (श्री. नवांगुळकृत) | ०—१२-० |
| फुलोरा (साहित्यसेवामंडळ) | ०—८-० |
| शिव—वात्सल्य (श्री. घाटेकृत) | ०—१-० |
| स्फूर्तिकिरण (राष्ट्रीयगीतें) | ०—१-० |

हा सर्व गट एकदम घेणारास दोन रुपयांत मिळतो.

व्यवस्थापक, श्रीलक्ष्मी प्रेस, कराड.



—[ मुद्रक—श्रीलक्ष्मी प्रेस, कऱ्हाड. ]—